# दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र
# विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे
## वार्षिक अहवाल
## शैक्षणिक वर्ष 2017 18

**प्रा. डॉ एस.जी. गोल्डे** — **समन्वयक**

**प्रा.डॉ.सी.एस.वाणी** — **सहाय्यक**

शैक्षणिक वर्ष 2017 18 मध्ये आपल्या महाविद्यालयात पदवी स्तरावर 21 व पदव्युत्तर स्तरावर 9 असे एकूण 30 दिव्यांग विद्यार्थी प्रवेशित होते. दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्राच्या वतीने या विद्यार्थ्यांना विविध सोयी सुविधा महाविद्यालयाकडून मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शनाची सोय, अभ्यासक्रमाव्यतिरिक्त ब्रेल लिपीतील पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली जातात. अभ्यासक्रमातील विषयाचे रेकॉर्डिंग विषयाचे प्राध्यापक यांच्या सहकार्याने उपलब्ध करून दिले जातात. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात टॉकिंग सॉफ्टवेअर असलेले संगणक व इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत.

महाविद्यालयातील विविध उपक्रमामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले जाते. यामुळे दिव्यांग विद्यार्थी वकृत्व स्पर्धा, कविता वाचन, गीत गायन इत्यादी विविध कलाप्रकारात सहभागी होतात. याचे फलित म्हणून विनय अनंत वाघ या दिव्यांग विद्यार्थ्याने भारतीय सुगमगीत, किशोर भानुदास जराड यांनी गवळण तर तुषार कैलास खैरनार यांनी वादविवाद या तीन विद्यार्थ्यांना जिल्हास्तरीय युवारंग मध्ये सहभाग नोंदवला. विनय अनंत वाघ या दिव्यांग विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवारंग मध्ये तृतीय क्रमांक मिळवला.

यावर्षी विभागातील 12 विद्यार्थ्यांना “ हेल्प द ब्लाइंड फाउंडेशन चेन्नई ” या संस्थेकडून  75,000/- रुपयाची आर्थिक मदत मिळाली. या ट्रस्टचे पदाधिकारी श्री व्ही.डी. सावकारे व संस्थेचे मान्यवर आणि पदाधिकारी यांच्या हस्ते या शिष्यवृत्तीचे धनादेश द्वारे वाटप करण्यात आले. तसेच “ हिंदुस्तान पेट्रोलियम

कार्पोरेशन लिमिटेड मुंबई " या संस्थेकडून 11 दिव्यांग विद्यार्थ्यांना रुपये 71500/- ची शिष्यवृत्ती मिळाली. याबरोबरच "वाय.सी.झेड. एज्युकेशनल अँड चॅरिटेबल फंड मुंबई " या संस्थेकडून चार विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये 500/- ची शिष्यवृत्ती मिळाली. अशा वेगवेगळ्या संस्थेकडून एकूण रुपये 161500/- ची शिष्यवृत्ती मिळाली. तसेच केंद्र सरकारच्या सामाजिक कल्याण व न्याय विभागाकडून सहा विद्यार्थ्यांना स्मार्टफोन व स्मार्ट पांढरी काठी मिळाली.

विशेष म्हणजे दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लेखनिकाची गरज असते, कनिष्ठ महाविद्यालयातील पर्यवेक्षक प्रा. पंजाबराव व्यास व त्यांचे सर्व सहकारी यांच्या साहयाने दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिक मिळून दिला जातो. या निमित्ताने कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनीचे आभार व्यक्त करतो.

धन्यवाद.

आपला
प्रा. डॉ.सर्जेराव गंगाधर गोल्डे
समन्वयक,
दिव्यांग विद्यार्थी प्रगत अध्ययन केंद्र
विद्यावर्धिनी महाविद्यालय,धुळे